# उर्जा रंगभवन
# वापरण्यासाठीचे नियम

१. एक शिफ्ट पूर्वतयारीसह ५ तासांची आहे. (सोमवार ते शनिवार - ४ ते ९ किंवा ५ ते १०) (रविवार किंवा सुट्टीचा दिवस - सकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत कोणतेही ५ तास)
२. तयारीसाठी जादा तास हवे असल्यास प्रति तास १५०० शुल्क भरावे लागेल. जादा तास घेऊन दोन प्रयोग केल्यास दोन शिफ्टचे दर आकारण्यात येतील.
३. तारीख निश्चित करायची असल्यास संपूर्ण बुकिंग रक्कम भरणे गरजेचे आहे . तरच बुकिंग नक्की करण्यात येईल .
४. कार्यक्रम रद्द करणार असल्यास किमान ८ दिवस आधी कल्पना दिल्यास बुकिंग रकमेतील २५% रक्कम वजा करून उर्वरित रक्कम देण्यात येईल. त्यानंतर कोणतीही रक्कम परत मिळणार नाही. तारीख बदलून हवी असल्यास आमच्या कडील उपलब्ध तारखेतुन मिळू शकेल.
५. AC कार्यक्रम सुरु करण्यापूर्वी अर्धा तास आधी सुरु होईल.
६. साउंड आणि लाईट मधील एखादी सेवा आमच्याकडे उपलब्ध नसेल तरच बाहेरून आणता येईल. तशी पूर्व परवानगी घेणे गरजेचे आहे.
७. थेट रंगमंचावर रेडीयम लावण्यास सक्त मनाई आहे. आम्ही दिलेल्या खुणे व्यतिरिक्त गरज भासल्यास कागदी पट्ट्यावर रेडियम लाऊ शकता, सभागृह सोडण्यापूर्वी त्या कागदी पट्ट्या, रेडीयम काढणे ही आयोजकांची जबाबदारी आहे.
८. कार्यक्रमाशी निगडित सर्व साहित्य कार्यक्रम संपल्यावर त्याच दिवशी २ तासात घेऊन जावे. त्यानंतर गहाळ झाल्यास व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.
९. एखाद्या कार्यक्रमास शासकीय मान्यता हवी असल्यास ती घेणे हि आयोजकांची जबाबदारी आहे.
१०. वीज पुरवठा खंडित झाल्यास जनरेटर सुविधा 'सशुल्क' उपलब्ध आहे. सुरु होण्यासाठी ३ मिनिटे लागतात. त्यासाठी २ दिवस आधी पूर्व परवानगी देणे गरजेचे आहे.
११. सर्व सशुल्क सेवा बाबत किमान २ दिवस आधी कल्पना देणे गरजेचे आहे.
१२. ऐन वेळी आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे कार्यक्रम होऊ न शकल्यास, तसेच एखादी नैसर्गिक आपत्ती किंवा दुर्घटना घडल्यास कोणत्याही प्रकारे ऊर्जा रंगभवन जबाबदार रहाणार नाही.
१३. उर्जा रंगभवनात कोणतेही रंग अगर चमकी उडवू नये. (गरज असल्यास व्यवस्थापनाच्या पूर्व परवानगीने 'सशुल्क' मॅटिंग टाकून देऊ)
१४. कार्यक्रमाचे जाहिरात, बॅनर लावणार असल्यास मेन गेट जवळील नियोजित जागी लावणे बंधनकारक आहे. इतरत्र लावल्यास ५०० रु दंड आकारण्यात येईल. स्टँडी आपल्याला हव्या असलेल्या ठिकाणी लावू शकता.
१५. बाहेरील आवारात फटाके, डी जे सिस्टीम लावता येणार नाही. अन्यथा सक्तीने २००० रु दंड आकारण्यात येईल.
१६. रंगमंचावर धूप व दीपप्रज्वलन व्यतिरिक्त आग पेटवण्यास सक्त मनाई आहे. अन्यथा १००० रु दंड आकारण्यात येईल.
१७. रंग मंचावर श्रीफळ फोडण्यास सक्त मनाई आहे. मंचाच्या खाली (नियोजित जागी) फोडल्यास चालेल. अन्यथा ५०० रु दंड आकारण्यात येईल.
१८. विंग, स्टेज तसेच पडद्यावर पिना मारण्यास सक्त मनाई आहे.(चांगली चिकटपट्टी आम्ही पुरवू) अन्यथा ५०० रु दंड आकारण्यात येईल.
१९. कार्यक्रमादरम्यान स्पॉट लाईट बल्प उडाल्यास १५०० रु प्रत्येकी आणि पार लाईट बल्प उडाल्यास २००० रु प्रत्येकी प्रमाणे रक्कम आयोजकांनी देणे आवश्यक आहे.
२०. खाद्य पदार्थ आत नेण्यास सक्त मनाई आहे. पाणी बाटली नेऊ शकता. ( टिप - हि आयोजकांची जबाबदारी आहे. आयोजकांनी प्रेक्षकांना चेक करून आत सोडावे, अन्यथा २००० सफाई कर लावण्यात येईल.)
२१. रंगभवन भाड्याने द्यायचे कि नाही याचे संपूर्ण अधिकार उर्जा रंगभवन ने राखून ठेवलेले आहेत.
२२. वरील नियम मोडल्यास प्रत्येक नियमास सक्तीने दंड आकारण्यात येईल. अनामत रक्कमेतून दंडाची रक्कम सक्तीने वजा केली जाईल.

**वरील सर्व नियम मला / आम्हाला मान्य आहेत . तशी स्वाक्षरी देत आहोत.**

| आयोजकांची सही | उर्जा रंगभवन सही |
|---|---|

**रंगमंच मापे :** खोली 14 फुट, रुंदी 26 फुट फ्रंट, 22 फुट बॅक.
**प्रोसेनियम आर्क :** 14×26
**आसन क्षमता :** 200

### उपलब्ध सुविधा
1) जनरेटर 2) सुसज्ज ग्रीन रूम 2 , 3) स्वतंत्र पार्किंग व्यवस्था

### लेव्हल्स
(6×4, 9 इंची = 4 ) (5×4, 12 इंची =1) (लेव्हल फोल्डेबल आहेत.) मोढे - 6 नग.

### लाइट्स उपलब्ध सामग्री
ऑपरेटिंग - AVO लाईट ,पावर पॅक - 6, स्पॉट/ फ्रेनेल - 25 (1k), PC - 3,
फोको - 3 ,पार कॅन - 8 (1k), लाईट स्टॅण्ड - 6, RGBW - 18 ( 10 लास्ट बार, 8 FOH),
अल्ट्रा व्हायलेट LED - 4 (FOH)

### साउंड उपलब्ध सामग्री
ऑपरेटिंग सिस्टीम - यामाहा 24 चॅनल ( अनॅलॉग )
6 सिनायझर माईक ( कॉडेड), 2 सिनायझर माईक ( कॉडलेस ),
4 कन्डेन्सर माईक ( सिलिंग ), 2 ग्राउंड माईक ( फुट माईक )
2 बेस, 2 मिड , 4 ओपन , 2 मॉनिटर.

---

## उर्जा रंगभवन बुकिंग दर
**सोमवार ते शुक्रवार : 13,000 ( 1 शिफ्ट ) + (10,000 अनामत )**
**शनिवार , रविवार व सुट्टीचा दिवस : 15,000 ( 1 शिफ्ट ) + (10,000 अनामत )**

---

# उर्जा रंगभवन च्या बुकिंग रकमेत आपल्याला खालील गोष्टी मोफत मिळतील

१) जनरल लाईट
२) स्पॉट लाईट-६
३) डायस-१
४) डायस माईक-१
५) कॉडलेस माईक-२
६) शुद्ध पिण्याचे पाणी

# बुकिंग रकमे व्यतिरिक्त इतर सशुल्क सुविधा

| **सुविधा** | **माफक दर** |
| --- | --- |
| स्पॉट लाईट | १०० |
| पार लाईट | १५० |
| पी सी स्पॉट | २०० |
| LED लाईट | २०० |
| गाण्यांचे स्पेशल माईक | १०० |
| माईक/लाईट स्टॅन्ड | ५० |
| स्टेज मॉनिटर जोडी | १५०० |
| स्टेज वरील ग्रे मॅट | १५०० |
| जनरेटर | २००० (प्रती तास) |
| चहा / कॉफी | १५ |
| घरगुती जेवण (३ पोळी , २ भाजी , वरणभात ) | १५० |